आगच्छत् शिक्षार्थम्। निर्गच्छत् सेवार्थम्।

# महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा), औरंगाबाद, महाराष्ट्र

## School Leadership Academy

## Maharashtra

## मोड्यूल क्र.७

# महाराष्ट्रातील अतिदुर्गम भागातील शाळा कोविडमुळे बंद (लॉक डाऊन) झाल्यावर मुलांचे शिक्षण सुरु ठेवण्यात शालेय नेतृत्वाची भूमिका.

# Role of School Leadership in Continuing Education of Children in Schools in Remote areas of Maharashtra after Closure due to Covid Pandemic

**प्रास्ताविक-**

पुरोगामी महाराष्ट्रातील शिक्षण व्यवस्थेला गौरवशाली इतिहास आहे. शेकडो वर्षांपासून गुरुकुल परंपरेपासून तर आताच्या सुसज्ज शाळेपर्यंत शिक्षणाची गंगा अव्याहतपणे सुरु आहे. बालपणा पासून औपचारिक शिक्षणासाठी विद्यार्थी गुरूकडे ,शिक्षकांकडे जाणे ही एक सहज बाब आहे.शेकडो वर्षांपासून शिक्षण व्यवस्थेत अनेक स्थित्यंतरे झाली, कालानुरूप अभ्यासक्रमात परिवर्तने झाली, पण शिक्षण व्यवस्थेतील शिकविणे आणि शिकण्याची प्रक्रिया निरंतरपणे शाळांमधून सुरु आहे. मानवी जीवनाचा अपरिहार्य भाग असलेल्या या शाळा आणि इतर शैक्षणिक संस्था कोणत्यातरी कारणाने वर्षभर बंद राहू शकतात, मुलांना वर्षभर शाळेत न जाता घरीच शिकावं लागेल अशी कल्पना कोणीही कधीच करू शकत नाही.

सन २०२० च्या मार्च महिन्यात ही कल्पना सत्यात उतरली आणि न भूतोनभविष्यती असा अनुभव आला. फक्त शाळाच नाही तर संपूर्ण जगाच्या रोजच्या दैनंदिन जीवनाला टाळेबंदी लागली. जगाचे सर्व व्यवहार ठप्प झाले.कोविड-१९ या विषाणूच्या प्रादुर्भावामुळे मानवाचे रोजचे व्यवहार बंद करावे लागले. अतिशय संसर्गजन्य रोग असल्याने मुलांच्या शाळा आहे त्या परिस्थितीत एका दिवसात बंद करण्यात आल्या. बोर्डाच्या परीक्षा ,इतर वर्गांच्या वार्षिक परीक्षा घेताच आल्या नाहीत. बंद झालेल्या शाळा संपूर्ण वर्षभर या महामारी मुळे बंदच ठेवाव्या लागल्यात. यातून विद्यार्थ्यांच्या संपूर्ण एक वर्षाच्या शिक्षणाचा मोठा बिकट प्रश्न

तयार झाला. विद्यार्थ्यांचे एक वर्ष वाया जाण्याची भीती निर्माण झाली. याही परिस्थितीत समस्येला संधी मानत मुलांना विविध माध्यमातून गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याचे काम मुख्याध्यापक व शिक्षकांनी सुरु केले. या काळात विविध समस्यांमुळे मुलांना शिकते ठेवणे सहज सोपे काम नव्हते तरी आपल्यातील शालेय नेतृत्वाची कास धरीत अनेक शाळांनी अशा परिस्थितीतही मुलांना शिक्षण देण्याचे काम यशस्वीपणे सुरु केले.

**मोड्यूल अध्ययनाची उद्दिष्टे-**

- शाळा लॉकडाऊन असण्याची संकल्पना समजून घेणे.
- शाळा लॉकडाऊन असतांना विद्यार्थ्यांच्या शिकण्यासाठी यशप्राप्त मुख्याध्यापकांच्या कार्याचा अभ्यास करणे.
- शाळा लॉकडाऊन झाल्यावर विद्यार्थ्यांचे ऑफलाईन शिक्षण सुरु राहण्यासाठी शालेय नेतृत्वाचा दृष्टिकोन विकसित करणे.

**शाळा लॉकडाऊनची संकल्पना-**

चीनमधील वुहानमधून कोरोना विषाणू सन २०२० साली जगभर पसरला. जगभरात कोरोनाने थैमान मांडले . फक्त चीनच नव्हे तर, पाहता पाहता संपूर्ण जगभरात या कोरोनाने हाहाकार माजवला.संपूर्ण मानव जातीचे अस्तित्वच संकटात सापडले. लोकांचे जीव या अतिशय संसर्गजन्य विषाणू पासून वाचविणे महत्त्वाचे ठरले आणि अशा या आणीबाणीच्या काळात 'लॉक डाऊन'हा शब्द सर्वसामान्यांसमोर समोर पहिल्यांदाच आला. लॉकडाऊन म्हणजे लोक किंवा समुदाय जिथे राहत असतील तिथेच राहण्याचे निर्बंध असणारे धोरण, जिथे लोक काही आपत्कालीन परिस्थितीमुळे इतरांसोबत संपर्क ठेवू शकत नाहीत. लॉकडाऊनसाठी 'स्टे-एट-होम' किंवा 'निवारा-इन-प्लेस' हे शब्द सुद्धा वापरले जातात. लॉकडाऊनचा शब्दशः अर्थ बघितल्यास इमारतीच्या बाहेरच्या दरवाजाला लॉक करणे,जेणेकरून बाहेरचा व्यक्ती आत जाऊ शकणार नाही व आतील व्यक्ती बाहेर येऊ शकणार नाही. व्यक्तीने जिथे आहे तिथेच राहणे यामध्ये बंधनकारक असते..



'लॉक डाऊन' हा पर्याय अतिशय क्वचित  वेळा स्वीकारला जातो. यामध्ये नागरिकांना आपला परिसर सोडून दुसरीकडे स्थलांतरित  केलं जातं किंवा घरातून बाहेर पडण्यास मज्जाव केला जातो. हा निर्णय किती कालावधीसाठी घ्यायचा हे त्या ठिकाणच्या परिस्थितीवर अवलंबून असतं. यामध्ये अनेक व्यवहार ठप्प केले जातात . वाहतुकीवरही याचे थेट परिणाम दिसून येतात. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था बस,रेल्वे,विमान सेवा बंद केल्या जातात. या निर्णयानंतर नागरिकांनी घराबाहेर न पडता घरातच राहणं अपेक्षित आणि बंधनकारक असतं. दुकाने, थियेटर, नाट्यगृह, जिम,स्विमिंग पूल ,इतकेच नाही  तर कार्यालयेही बंद असतात. Epidemic Disease Act 1897 अंतर्गत सरकार परिस्थितीशी दोन हात करण्यासाठी गरजेचे सल्ले, आदेश नागरिकांना देऊ शकते . सरकारकडून आखून दिलेले निर्णय न पाळल्यास हजारोंच्या जीविताना धोका पोहोचू शकतो. लॉकडाऊन करण्यात आलेल्या सर्व ठिकाणी कार्यालयं, दुकानं, मॉल, कॅफे, सामुदायिक केंद्र बंद असतात. चारपेक्षा जास्त व्यक्तींना एकत्र येता येत नाही. सार्वजनिक ठिकाणांवर गर्दी न करण्याचे आदेश असतात. यावेळी वैद्यकीय आणि अत्यावश्यक सेवा मात्र सुरू राहतात.

**लॉकडाऊन प्रकार-** लॉकडाऊन चे सामान्यतः ३ प्रकार आहेत.

**१.प्रतिबंधक लॉकडाऊन-** प्रतिबंधक लॉकडाऊन म्हणजे लोक, संस्था आणि प्रणालीची सुरक्षा आणि सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी कोणत्याही प्रकारचा  धोका टाळण्यासाठी, असामान्य परिस्थिती किंवा प्रणालीमधील कमकुवतपणाचे निराकरण करण्यासाठी प्रतिबंधात्मक पूर्वनियोजित  योजना. प्रतिबंधात्मक क्रियांचा  उद्देश म्हणजे  सामान्य परिस्थितीत उद्भवणारे धोके आणि जोखीम टाळणे, परंतु सोबतच   संस्था, प्रणाली यांच्या कार्यक्षमतेत  सुधारणां करणे हा देखील असतो.बऱ्याचदा ऐनवेळेला उद्भवलेल्या धोकादायक परिस्थितीत या योजना बारगळतात. त्यामुळे या प्रकारच्या योजना आखताना. धोक्याच्या  प्रकारावर आधरित त्या असाव्यात,त्या अंमलबजावणीसाठी सोप्या आणि लहान तसेच कोणतीही परिस्थिती हाताळण्यासाठी लवचीक असाव्यात.

**२.आणीबाणी लॉकडाऊन-** जेव्हा मानवाच्या  जीविताला धोका निर्माण होतो किंवा गंभीर दुखापतीची संभावना वाढते तेव्हा आणीबाणी लॉकडाऊन लावला  जाते.

**३.साथीच्या रोगा मधील लॉकडाऊन-** या प्रकारच्या लॉकडाऊनमध्ये समाजातील दैनंदिन हालचालींवर मर्यादा घातल्या जातात.काही संस्थात्मक कार्याला सुद्धा काही प्रमाणात प्रतिबंध घातला जातो.फक्त जीवनावश्यक बाबींचा पुरवठा केला जातो व अत्यावश्यक सेवा सुरु असतात. सन २०२० मध्ये  कोविड-१९ या साथीच्या रोगाच्या वेळी लॉकडाऊन ही संकल्पना मोठ्या प्रमाणात वापरण्यात आली, २३ जानेवारी २०२० ला या साथीच्या रोगामुळे चीन मधील वुहान येथे सर्वात पहिल्यांदा लॉकडाऊन लावण्यात आला . एप्रिल २०२० च्या पूर्वार्धात जगाच्या एकूण लोकसंख्येच्या अर्ध्या लोकसंख्येला  लॉकडाऊन लावण्यात आला. एप्रिलच्या शेवटी १.३ अब्ज भारतीय लोकांना घरातच लॉक डाऊन करण्यात आले.  हे निर्बंध इतके कडक होते की जीवनावश्यक बाबी सुद्धा ठरावीक वेळेतच नागरिकांना उपलब्ध करून दिल्या जात होत्या .या काळात कोविड झालेल्या रुग्णांना विलगीकरणात  ठेवण्याची संकल्पना पण पुढे आली.



२५ मार्च २०२० पासून भारतात प्रशासनाला लॉकडाऊनचा निर्णय घ्यावा लागला. तो इतक्या अनपेक्षितपणे आणि तातडीने घ्यावा लागला की,दहावी-बारावीच्या काही विषयांच्या बोर्ड परीक्षा,तसेच विद्यापीठाच्या व इयत्ता पहिली ते नववीच्या अंतिम परीक्षा घेणे शक्यच झाले नाही.मार्चमध्ये अपूर्ण राहिलेला अभ्यासक्रम तसाच अपूर्ण राहिला आणि विद्यार्थी,पालक व शिक्षण क्षेत्राशी संबंधित प्रत्येक घटक गोंधळून गेला की आता पुढे काय आणि कसे?

**लॉकडाऊनमुळे निर्माण झालेल्या शैक्षणिक समस्या-**

युनेस्को'च्या अहवालानुसार एप्रिल २०२०मध्ये १८८ देशांत १५४ कोटी विद्यार्थी लॉकडाऊनमुळे घरी बसले . भारतात १५ लाख शाळा बंद करण्यात आल्या . त्यामुळे २६ कोटी विद्यार्थी व ८९ लाख शिक्षकांना घरी बसावे लागले , तर उच्च शिक्षणात ५० हजार शिक्षणसंस्था बंद केल्या गेल्या व ३.७० कोटी विद्यार्थी आणि १५ लाख महाविद्यालयीन शिक्षक घरी लॉकडाऊन झाले . कोरोनाची समस्या ही केवळ आरोग्याची समस्या आहे,असे मानले जात होते, पण या संकटाला शैक्षणिक समस्यांची बाजू आहे, हे सुद्धा लक्षात घेणे आवश्यक आहे. शिक्षणात आलेल्या या व्यत्ययाने मुलांना शिक्षण हक्कापासून वंचित राहावे लागत आहे. ते शाळा बाह्य होण्याची भीती निर्माण होत आहे असे मत 'युनेस्को'ने नोंदविले . यातून मार्ग काढून मुलांचे शिक्षण सुरु ठेवण्यासाठी त्यांना घरी राहूनच शिकते करायचे तर तंत्रज्ञानाची मदत घेणे गरजेचे होते. दूरशिक्षण, माहिती तंत्रज्ञानाचा वापर, यू-ट्यूब, हॅंगआउट, मल्टिमीडिया, मोबाइल फोन, ई-लायब्ररी, दूरदर्शन इ. माध्यमांतून भारतासह अनेक देशांनी तातडीने विविध प्रकारचे उपक्रम सुरू केले. विद्यार्थी आर्थिकदृष्ट्या वरच्या स्तरातील असल्यास लॅपटॉप, इंटरनेट,स्मार्ट फोन इ. खर्च त्यांना परवडतो. त्यामुळे ऑनलाइन अभ्यास करण्याची सोय त्यांना उपलब्ध होते, पण प्रामुख्याने समस्या आहे, ती बहुसंख्य कष्टकरी, गरीब वर्गातील मुलांची. भटके-विमुक्त, आदिवासी, ग्रामीण भागांतील सरकारी किंवा अनुदानित शाळेत जाणाऱ्या मुला-मुलींची! त्यांना अशा लॉकडाऊनच्या काळात उदरनिर्वाहाचीच भ्रांत असल्याने तंत्रज्ञानाच्या सोयी त्यांनी उपलब्ध करून घेणे आणि डोंगराळ दुर्गम भागात तंत्रज्ञान पोहोचणे सहज शक्य नाही.

माहिती तंत्रज्ञानामुळे शिक्षणाचा प्रसार, शिक्षणाचा विस्तार, शिक्षणाचा दर्जा, शिक्षणाची संधी वाढविण्यास भरपूर वाव आहे. 'ट्राय'च्या अहवालानुसार भारतात २०२०मध्ये इंटरनेट वापरणाऱ्यांची संख्या ६८.४५ कोटी आहे. मोबाइल फोन वापरणाऱ्यांची संख्या ४८.८२ कोटी आहे. तर, इंटरनेटसह स्मार्टफोन वापरणाऱ्यांची संख्या ४०.७२ कोटी आहे. टीव्ही पाहणाऱ्यांची संख्या ७६ कोटी आहे. माहिती तंत्रज्ञानाचा विस्तार एवढा झालेला दिसत असला, तरी त्यात प्रचंड विषमता आहे. भारतात ५२ टक्के जनता इंटरनेटचा वापर करते म्हणजे निम्मा भारत इंटरनेटच्या लाभापासून वंचित आहे. ग्रामीण भागात ३६ टक्के जनता व शहरात ६४ टक्के जनता इंटरनेटचा वापर करते, तर ६७ टक्के पुरुष व ३८ टक्के स्त्रिया भारतात इंटरनेटचा वापर करतात. माहिती-तंत्रज्ञान हे शहरी, सधनवर्ग व पुरुष यांचीच सध्या तरी मक्तेदारी आहे असे दिसून येते . त्यामुळे शालेय शिक्षणासाठी उपयोगात आणल्या जाणाऱ्या ऑनलाइन प्रकल्पांचा फायदा मर्यादित स्वरुपात होतो असे दिसून येते. तसेच शिक्षक जोपर्यंत प्रत्यक्षात विद्यार्थ्यांना समोर बघून शिकवीत नाहीत तोपर्यंत अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत जिवंतपणा येत नाही. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अध्यापन करीत असताना त्यांच्याशी साधला जाणारा भावनिक संवाद देखील अध्ययन-अध्यापन प्रक्रियेचा एक भाग असतो हे दुर्लक्षित करून

चालणार नाही. शिक्षक व विद्यार्थी यांच्यामध्ये प्रत्यक्ष आंतरक्रिया होणार नाही तोपर्यंत अभ्यासातील समस्या ,अडचणी सोडविता येणे शक्य नाही . या शिक्षण पद्धतीमध्ये आवश्यक असलेले अँड्रॉइड मोबाईल,संगणक यांपैकी कोणतेही साधन पालकांकडे नसल्यामुळे मुलांच्या मनात न्यूनगंड तयार होतोना दिसून येतो . ग्रामीण भागात ,दुर्गम भागात ही फार मोठी समस्या आहे. विजेच्या , इन्टरनेटच्या समस्येमुळे विद्यार्थी ऑनलाईन शिक्षणापासून वंचित राहतात.मुलांना शिकते ठेवण्यासाठी ऑनलाइन शिक्षणात वरील अनेक समस्या असल्यामुळे सर्वच विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षण पोहचविणे शक्य नव्हते .त्यामुळे मुलांच्या शिक्षणात खंड पडण्याची, काही मुले शाळा बाह्य होण्याची शक्यता निर्माण झाली होती . या सर्व बाबींचा विचार करता जिथे ऑनलाइन शिक्षण पोहचू शकत नाही अशा वाड्या वस्त्यांमध्ये,दुर्गम भागात, झोपडपट्टी व ग्रामीण भागात ऑफलाइन शिक्षणा शिवाय पर्याय नव्हता. अशा प्रतिकूल परिस्थितीत काही शिक्षकांनी आपल्या विद्यार्थ्यांचे शिक्षण थांबू नये म्हणून स्टे एट होम चे शासनाचे आदेश, वाहतुकीच्या साधनांचा अभाव,सामाजिक दूरीकरण (social distancing )या सर्वांचा विचार करीत मुलांच्या शिक्षणाला सुरुवात केली.अशा मुख्याध्यापक ,शिक्षकांच्या यशोगाथा संपूर्ण शिक्षण व्यवस्थेलाच प्रेरणादायी ठरणाऱ्या आहेत.

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे महाराष्ट्र यांनी मुलांचे शिक्षण थांबू नये म्हणून ऑनलाईन शिक्षणाला सुरुवात केली. शासनाच्या निर्देशानुसार शिक्षकांनी काम सुरु केले. यू-ट्यूब, हँगआउट, मल्टिमीडिया, मोबाइल फोन, ई-लायब्ररी, दूरदर्शन इ. माध्यमांतून विविध पद्धतीने मुलांच्या शिक्षणासाठी प्रयत्न सुरु झाले. शिक्षक सुद्धा आपल्या कल्पकतेतून मुलांना शिकते ठेवण्याचा प्रयत्न करायला लागले, पण जिथे आधुनिकतेचा कोणताच स्पर्श नाही,गावात जायला रस्ता नाही,तंत्रज्ञानाचा पुसटसा स्पर्श असलेले आदिवासी गाव काल्लेखेतपाडा. गुगल मॅपवर शोधायला गेलो तर आजही सापडणार नाही.सातपुड्याच्या अतिदुर्गम धडगाव तालुक्यात उमराणी बु. या गावाचा पाडा असलेले काल्लेखेतपाडा, या अतिदुर्गम भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी प्रयत्न करणाऱ्या शिक्षकाची ही गोष्ट आहे.रुपेशकुमार नागलगावे आणि त्यांचे सहकारी लक्ष्मीपुत्र उप्पीन यांच्या वस्तीशाळेचे २००१ मध्ये प्राथमिक शाळेत रुपांतर झाले आणि अति दुर्गम आदिवासी भागातील या शाळेने हळूहळू कात टाकायला सुरुवात केली.१४ मुलांच्या सोबत सुरु झालेला हा प्रवास आज १४० पटसंख्ये पर्यंत पोहोचला आहे. इतकेच नव्हे तर जगभरातील शिक्षणाकरिता अग्रगण्य असलेल्या जगातील १०० प्रतिष्ठित शाळांच्या ग्लोबल शोकेससाठी या शाळेची निवड झाली आणि ८ ऑक्टोबर २०२० ला महाराष्ट्राचे शिक्षण आयुक्त विशाल सोलंकी यांनी या शाळेचे सादरीकरण या जागतिक लाइव्ह इव्हेंट मध्ये केले. अशा अतिदुर्गम, आधुनिकतेचा, तंत्रज्ञानाचा वारा नसलेली ही शाळा पण एका मुख्याध्यापकाच्या नेतृत्व कौशल्याने किती उंच भरारी घेऊ शकते याचे हे उत्तम उदाहरण आहे.

**लॉकडाऊन काळातील शिक्षण - शिक्षणाचा यज्ञकुंड**

नंदुरबार जिल्ह्यातील दुर्गम आदिवासी समाजाची 30 ते 40 कुटुंबाची लोकवस्ती म्हणजेच काल्लेखेतपाडा. या पाड्यावर जिल्हा परिषदेची इयत्ता १ ली ते ८ वी पर्यंतची १२ पाड्यावरील १४० मुलांसाठीची ही शाळा कोविड-१९ चा प्रादुर्भावामुळे बंद केली गेली. अतिदुर्गम भागातील ही आदिवासी मुले शाळा बंद, शिक्षकांचे शाळेत येण बंद झाल्यामुळे गाई बकऱ्या चारण्यासाठी रानात जाऊ लागली. आईवडिलांना शेतीत मदत करू लागली. शहरात कोरोना चे प्रमाण वाढत होते, पण या अतिदुर्गम भागाला त्याची फारशी झळ पोहोचलेली नव्हती. पण शासनाच्या आदेशाने शाळा सुरु करणे शक्यच नव्हते.मुलांना शिक्षणाची ओढ होती आणि शिक्षकांना मुलांना शिकते ठेवण्याची जबरदस्त इच्छा होती. पण मार्ग दिसत नव्हता. कोरोनाचा प्रादुर्भाव जसजसा वाढू लागला तसतसे लॉक डाऊनपण वाढायला लागले. हातावर हात धरून गप्प बसणे रुपेशकुमार सर आणि त्यांच्या सहकाऱ्यांना कठीण जाऊ लागले. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे

यांच्या मार्फत मुलांना शिकते ठेवण्यासाठी अनेक उपक्रम विविध माध्यमातून सुरु झाले. पण सर्वच उपक्रमांना स्मार्टफोन,इंटरनेट,टीव्हीची गरज होती. या पाड्यावर तर केवळ दोन पालकांकडे मोबाईल होता आणि इंटरनेटची तर रेंज नाही.अशा परिस्थितीत करायचे काय?ऑनलाईन शिक्षण शक्यच नव्हते. शेवटी मुलांना शिकते ठेवण्यासाठी,ती अभ्यासापासून दूर जाऊ नये म्हणून रुपेशकुमार सरांनी एक योजना आखली. टेकडीची शाळा, झाडाखाली शाळा, वाहत्या नदी- नाल्यांच्या प्रवाहासोबत शाळा , रात्र अभ्यास गट, स्वयंसेवकांच्या मदतीने शिक्षण अशा उपक्रमांतून नैसर्गिक वातावरणात कोरोनामुळे पुसल्या जाणाऱ्या शिक्षणाच्या रेघोट्यांना पुन्हा गिरविण्याचा प्रयत्न सुरु केला.

**शिक्षक आपल्या दारी-**



# काल्लेखेतपाडा शाळेचा 'शिक्षक आपल्या दारी' उपक्रम

सर्वप्रथम वर्गानुसार,विषयांनुसार आणि घटकांनुसार अनेक कृतिपत्रिका या शिक्षकांनी तयार केल्या.मुले स्वयंअध्ययन करू शकतील, सराव करू शकतील असे त्याचे स्वरूप ठेवले. सर्वत्र लॉकडाऊन, त्यामुळे झेरॉक्स कुठून करणार? शेवटी शाळेने एक झेरॉक्स मशिनच विकत घेतले आणि सुरु झाला 'शिक्षक आपुल्या दारी उपक्रम'. शिक्षक कृतिपत्रिका घेऊन १२ टेकड्यांवरील विद्यार्थ्यांकडे जायला लागले, गटात अभ्यास सुरु झाला. शिक्षक आपल्या दारात आलेले पाहून विद्यार्थ्यांना तर आनंद झालाच, पण पालकांचा शिक्षकांच्या प्रति आदर द्विगुणित झाला. मुलांच्या शिक्षणासाठी शिक्षक घेत असलेले परिश्रम पाहून पालक सुद्धा लागेल ती मदत करू लागले.यातून गावातील मोठ्या मुलांची स्वयंसेवकांची फळी तयार झाली. शाळेमध्ये बालसंसद पूर्वीपासूनच अस्तित्वात होती.या मंत्रिमंडळाने या काळात विशेष उल्लेखनीय कार्य केले. कृतिपात्रिका वाटप,संकलन, अदलाबदल करून त्याचा योग्य वापर करणे, तसेच प्रामुख्याने इयत्ता पहिलीत दाखल झालेल्या मुलांना अक्षर ओळख , अंक ओळख करून देणे हे काम चिमुकले बाल मंत्रिमंडळ उत्साहाने करीत होते आणि त्यातून मुलांचा अभ्यासाचा एक एक टप्पा पुढे जात होता.

**टेकडी ची शाळा-**





'शिक्षक आपुल्या दारी' या उपक्रमातून जेव्हा शिक्षक विद्यार्थ्याच्या घरी जायला लागले तेव्हा बरेच विद्यार्थी घरी नसायचे . ते टेकडीवर गुरे, बकऱ्या चारायला घेऊन जायचे , तर काही शेतात काम करायचे . अशा वेळी या मुलांचे शिक्षण थांबू नये म्हणून वेगळी काही उपाययोजना करणे गरजेचे होते.शेवटी मुलांच्यापर्यंत शिक्षण पोहोचविण्याची योजना आखण्यात आली. चारही शिक्षक रोज वेगवेगळया टेकड्यांवर गुंडाळी फळा, खडू, पाट्या, पेन्सिल, कृतिपत्रिका घेऊन फिरू लागले . नदी , नाले,यांच्या काठावर, आंब्याच्या झाडाखाली, टेकडीवर , रस्त्यावर मुले जिथे दिसतील तिथे त्यांना गुंडाळी फलक काढून शिकवायचे. टेकडीवर गुरे चरायला घेऊन गेलेल्या मुलांना अत्यंत आनंद झाला. कोटा पावरा या पालकाने टेकडीवर एक झोपडी बांधली, तिथे पण एक छोटी शाळा सुरु झाली. गुरे चरता चरता मुले मुळाक्षरे, पाढे, शालेय कविता, प्रार्थना गीत मोठमोठ्याने म्हणू लागली,गणिताची उदाहरणे सोडवू लागली, पाठ वाचू लागली आणि नदी , नाल्यात , शिक्षणाचा गंध दरवळू लागला.

**मिनी स्कुल**



ऑगस्ट २०२० नंतर हळूहळू जनजीवन पूर्व पदावर येऊ लागले तेव्हा शिक्षकांची शिक्षणाविषयी असलेली तळमळ ओळखून गावातील काही शिकलेल्या तरुणांनी सरांशी चर्चा केली. लहान मुलांच्या अभ्यासासाठी मदतीची तयारी दर्शविली. त्यातूनच मिनी स्कूल ची सुरुवात झाली. एखाद्या घरात, झोपडीत ही शाळा भरायची. दिलीप पावरा व चेतन पावरा या तरुणांनी होळी पाडा (उमराणी) येथे पहिली मिनी स्कूल

म्हणजेच अभ्यास गट शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली सुरु केला. कैलास पावरा (ओहाया पाडा ), विश्राम पावरा, रेखा पावरा (बारी पाडा) , मुकेश पावरा (कुंडाई पाडा) , दिनेश पावरा, पंकज पावरा (काल्लेखेतपाडा) असे पाच मिनी स्कुल तयार झाले. हे तरुण आपल्या पाड्यावरील मुलांना शिक्षण देण्याचे काम करू लागले . चारही शिक्षक त्यांना योग्य दिशा देण्याचे, मार्गदर्शन करण्याचे,मदत करण्याचे काम करीत होते . मिनी स्कूल मुळे मुलांना रोज 11 ते 2 या वेळेत शाळेत आल्यासारखे वाटू लागले व जी शिक्षणाची नाळ तुटेल याची भीती होती या मिनी स्कूलच्या माध्यमातून जिवंत राहिली यात शंका नाही.

**रात्र अभ्यास गट व अभ्यास कोपरे-**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, काल्लेखेतपाडा या शाळेने मागील दोन वर्षांपासून रात्र अभ्यासगट सूरू केलेला होता. तो रात्र अभ्यास गट पुन्हा पालकांनी या काळात स्वतःहून सुरू केला . कदाचित पालकांना शिक्षणाविषयी गोडी, आस,असावी किंवा मागील दोन वर्षांपासून गटात अभ्यास केल्याने मुलांमध्ये झालेले बदल त्यांच्या लक्षात आले असावे .यामुळे अभ्यास गटात मुलांना पाठवण्यासाठी ते उत्साहाने तयार झाले. शिक्षक रोज रात्री 8 ,9 वाजेपर्यंत गटांना भेटी देऊ लागले. पुन्हा नवचैतन्य जागविण्याचा प्रयत्न त्यांनी सुरु केला. प्रयत्न स्फुल्लिंग चेतवणारा असला की क्रांती घडते. शाळा जरी बंद असल्या तरी शिक्षण बंद पडू न देण्याचे काम या लॉकडाउन काळात गावकऱ्यांनी हिरीरीने केले. काल्लेखेतपाडा येथे तीन, ओहाया पाडा येथे एक, बारी पाडा येथे एक , सावरी पाडा , मुवाडी पाडा येथे एक एक असे एकूण सात रात्रीचे अभ्यास गट बघता बघता सुरू झाले.



आदिवासी पालकांनाही त्यांच्या मुलांच्या शिक्षणाबाबत असलेली तळमळ त्यांच्या प्रत्येक कृतीतून निदर्शनास येते. मुलांनी घेतलेला अभ्यास ते विसरू नये ,त्याचा त्यांना सराव व्हावा म्हणून सर्व पालकांच्या झोपड्यांमध्ये अभ्यास कोपरे तयार केले गेले. मिळालेल्या कृतिपत्रिका,वाचन साहित्य, पाढे,,इंगजी शब्द मुले त्या अभ्यास कोपऱ्यात लावून ठेवतात.

**बारीपाडा येथील अभ्यास कुटी-**



काल्लेखेतपाडा येथून चार किमी अंतरावर असलेल्या बारीपाडा येथें जाण्यासाठी आजही रस्त्याची सोय नाही. नेटवर्क, मोबाईल, रस्ता यापासून कोसो दूर असलेल्या या पाड्यावर 29 मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न होता. पाड्यावरील स्थानिक शिक्षक श्री तेगा पावरा यांनी पालकांमध्ये शिक्षणाची मशाल पेटविली व स्वतःच्या घरात मुलांना रोज शिकवू लागले. काही पालकांनी एकत्र येऊन विचार केला. शाळा अजून किती दिवस बंद राहील सांगता येत नाही त्यामुळे आपण या मुलांच्या अभ्यासासाठी झोपडी बांधू म्हणजे मुले रोज झोपडीत अभ्यास करतील. एका दुर्गम भागातील अदिवासी समाजातील पालकांनी मुलांच्या शिक्षणासाठी उचललेले हे पाऊल म्हणजे खरंच क्रांती होती. याचेच नाव उलगुलान कट्टा म्हणजेच शिक्षणाच्या क्रांतीचा कट्टा म्हणजेच ही बारीपाडा येथील मुलांची अभ्यासाची झोपडी किंवा कुटी...!!! आज घडीला या झोपडीत रोज 35 मुले शिक्षण घेत आहेत. मोठी मुले लहान मुलांना शिकण्यात मदत करतात. असे अनेक उपक्रम हाती घेऊन जिल्हा परिषद प्राथमिक शाळा , काल्लेखेतपाडा येथील मुख्याध्यापक श्री रुपेशकुमार नागलगावे सर , सह शिक्षक श्री तेगा पावरा सर , श्री दशरथ पावरा सर व श्री लक्ष्मीपुत्र उप्पीन सर यांनी कोरोनाच्या या जागतिक महामारीत शिक्षणाची ज्योत दुर्गम भागातील आदिवासी समाज, पालक, युवक , विद्यार्थ्यांना सोबत घेऊन चेतविण्याचा व जागृत ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न केला.

**चिंतनात्मक प्रश्न-**

१.श्री रुपेशकुमार नागलगावे सरांचे कोणते नेतृत्वगुण या यशोगाथेतून आपणांस दिसून आले ?

२.कोणत्या गोष्टींमुळे सरांना विद्यार्थी व पालकांशी भावनिक जवळीक साधता आली ?

३.अशा प्रकरच्या परिस्थितीत तुम्ही पालकांचा सहभाग कसा वाढवाल?

४.विद्यार्थ्यांचे व पालकांचे शिक्षकावरील प्रेम व विश्वास यामुळे कोणत्या गोष्टी साध्य झाल्या?

५.नागलगावे सरांनी काल्लेखेतपाडा येथे घडवून आणलेल्या यशस्वी बदलांची यादी करा.

**विचार करूया या चर्चा करूया -**

१.आपली शाळा एका डोंगरी भागातील गावात असून पावसाळ्यात land slide झाल्याने गावातील घरे, रस्ते, शाळा सर्वच वाहून गेले आहे. पुनर्निर्माणाचे काम सुरू आहे.पण त्याला अवधी लागणार आहे. गावात वीज,इंटरनेट सेवा सर्वच ठप्प झाले आहे. गावात १ ली ते ८वीचे ११२ विद्यार्थी असून ५ शिक्षकांच्या या शाळेचे तुम्ही मुख्याध्यापक आहात. अशावेळी आपण कसे नियोजन कराल ?

२.भारत-पाकिस्तान सीमारेषेवरील एका ग्रामीण भागात आपण मुख्याध्यापक म्हणून कार्यरत आहात. सीमारेषेवर अत्यंत तणावाचे वातावरण निर्माण झाले असून. नियमित शाळा भरविणे धोक्याचे आहे. अशा वेळी गावातील ७० मुलांचे शिक्षण थांबू नये म्हणून तुम्ही काय कराल?

**लॉक डाऊन क्षेत्रात काम करताना असेही करता येईल-**

१. या क्षेत्रात यशस्वीपणे काम करायचे असेल तर सर्वात महत्वाचे म्हणजे पालकांचे प्रबोधन,शक्य असल्यास गृहभेटी यातून त्यांच्या मध्ये शाळेबद्दल विश्वास निर्माण करणे.
२. विद्यार्थी व पालक यांच्या मनातील उद्भवलेल्या परिस्थिती बद्दलची भीती कमी करून प्रशासना बद्दल विश्वास निर्माण करणे.
३. शक्य होतील तेवढ्या प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याचा गावपातळीवर प्रयत्न करणे .
४. ग्रामशिक्षण समितीच्या मदतीने विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी भौतिक सुविधा उपलब्ध करून घेणे . समस्याग्रस्त परिस्थिती असतानाही मुलांच्या शिक्षणासाठी शाळेत सुरु असलेल्या चांगल्या उपक्रमांचे सामाजिक माध्यमांद्वारे प्रदर्शन करून शाळेसाठी शैक्षणिक साहित्य उपलब्ध होण्यासाठी लोकसहभाग / CSR मिळविणे.
५. काही वेळा अधिक धोकादायक परिस्थिती निर्माण झाल्यास पालक व विद्यार्थ्यांना धीर देणे.
६. स्थानिक समाजातील शिक्षित व्यक्तींच्या मदतीने / परिसरातील स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने डिजिटल साधनांच्या मदतीने गावात शिक्षण व आरोग्यविषयक, उचित जागृती व समाजप्रबोधन करणे .
७. ज्याठिकाणी सामूहिक शिक्षण देता येत नसेल तेथे गटपद्धती, तसेच वैयक्तिक मार्गदर्शनावर भर देणे.
८. मुलांचा अपेक्षित अभ्यासक्रम उद्भवलेल्या संकटांमुळे निर्धारित वेळेत पूर्ण होत नसेल तरी मुले कोणत्याही परिस्थिती विविध माध्यमातून शिकते ठेवण्यासाठी त्यांच्या संपर्कात राहणे.
९. शाळा बंद करावी लागली म्हणून मुलांचे शिक्षण थांबले नाही ते विविध मार्गाने सुरू ठेवता येऊ शकते हा विश्वास पालकांमध्ये व विद्यार्थ्यात निर्माण करणे.

**विद्यार्थी शिक्षण विकास आराखडा– नियोजन /**

सध्या तुम्ही कार्यरत असलेल्या शाळेतील सामाजिक ,आर्थिक भौतिक व सांस्कृतिक क्षेत्राबद्दल तुम्हांला ज्ञान आहे. तुमच्या शाळेतील सकारात्मक घटक व कच्चे दुवे यांची तुम्हाला जाणीव आहे. तुमचे उपलब्ध मनुष्यबळ व त्यांच्या सोबतच्या आंतरक्रिया याबद्दलची तुम्हास माहिती आहे व शाळा पुढील सहा महिने एका संसर्गजन्य रोगामुळे बंद असणार आहे या सर्व बाबींचा एकत्रित विचार करून मुलांच्या सहा महिन्याचा शिक्षण विकास आराखडा तयार करा .

**लॉकडाऊन असलेल्या विद्यार्थ्यांसाठी शासनाच्या विशेष योजना-**

१ .घरपोच पाठ्यपुस्तक
२. घरपोच शालेय पोषण आहार
३ १ ली ते १२ वी चा पाठ्यक्रम २५% कमी करणे.
४. प्रत्येक शाळेत प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे.
५ शाळा सुरू करण्याआधी त्या निर्जंतुक करून स्वच्छ करण्याची जबाबदारी स्थानिक प्रशासनावर सोपविणे.
५ संचारबंदीच्या काळात लर्निंग फॉर्म होम ची संकल्पना राबविणे.
६ टप्याटप्याने शाळा सुरू करणे.
७ परीक्षा घेणे शक्य नसल्याने मुलांच्या वर्षभराच्या मूल्यमापनावर वरच्या वर्गात बढती देणे.

८ आवश्यक असेल त्या परीक्षाचे आयोजन online करून, परीक्षेच्या स्वरुपात बदल करणे.
९ जास्त दिवस लॉक डाऊन राहिल्यास शाळाबाह्य झालेल्या मुलांचे सर्वेक्षण व त्यांना शाळा प्रवाहात पुन्हा आणण्यासाठी प्रयत्न करणे.
१० शिक्षकांनी तंत्रज्ञानाचा उपयोग अध्ययन अध्यापनासाठी करावा म्हणून मार्गदर्शन.
११ प्रत्यक्ष शाळा सुरू नसताना शिक्षण सुरू राहावे म्हणून दूरदर्शन,रेडीवो,मोबाईल इत्यादी विविध माध्यमांतून शिक्षण विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न करणे.

**लॉकडाऊन क्षेत्रातील नेतृत्वाची भूमिका या मोड्यूलची शालेय नेतृत्वाच्या दृष्टिकोनातून उपयुक्तता -**

शिक्षक प्रशिक्षणामध्ये आजपर्यंत लॉकडाऊन क्षेत्रातील नेतृत्वाची भूमिका या बद्दल कधी विचार करण्याची गरजच भासली नाही. कारण आज पर्यत जगाच्या इतिहासात अशी परिस्थितीच उद्धवलेली न्हवती . जगाचे सर्व व्यवहार बंद करून कित्येक महिने सर्वांना घरातच राहावे लागेल या बद्दल कधीच कल्पनाच केली नव्हती. पण गेल्या वर्षभरात सर्वांनी हे जगणे अनुभवलेले आहे. त्यामुळे भविष्यात पुन्हा अशी परिस्थिती उद्धवण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशावेळी शाळा बंद कराव्या लागल्यामुले मुलांचे शिक्षण थांबू नये, विविध मार्गांनी, विविध माध्यमांतून ते सुरु राहावे यासाठी अनेक पर्याय शिक्षकांच्या समोर असावे म्हणून या मोड्यूलची गरज निर्माण झाली आहे. सदर मोड्यूलचा उपयोग अशा प्रकारच्या कार्यक्षेत्रात काम करणाऱ्या नेतृत्वाला तर होईलच पण इतरही कार्यक्षेत्रातील शैक्षणिक नेतृत्व करणाऱ्या व्यक्तींसाठी निश्चितच उपयुक्त ठरणार आहे.या मोड्यूल मूळे पुढील परिणाम साधता येतील

- ✓ शिक्षण हक्क कायदा २००९ ची यशस्वी अंमलबजावणी.
- ✓ प्रत्येक विद्यार्थ्यांचा शिक्षण हक्क नैसर्गिक, सामाजिक, व आर्थिक परिस्थितीने बाधित होऊ न देता शिक्षणप्रक्रिया सुरू ठेवणे.
- ✓ नैसर्गिकआव्हान असणाऱ्या क्षेत्रांसंबंधित येणाऱ्या समस्यांचे पृथक्करण,विश्लेषण करून समस्येची सोडवणूक.
- ✓ OUT OF THE BOX जाऊन काम करण्याची प्रेरणा .

**समारोप –**

नैसर्गिक,सामाजिक,भौतिक परिस्थिती कितीही प्रतिकूल असली तरी त्यावर मात करण्याचे सामर्थ्य सक्षम शालेय नेतृत्वाजवळ असते. अपेक्षित यश मिळविण्यासाठी असा शालेय नेता प्रतिकूल परिस्थितीने खचून न जाता, आपल्या सहकाऱ्यांना सोबत घेतो, त्यांना विश्वासात घेऊन, सतत प्रेरणा - प्रोत्साहन देत कार्यप्रवण ठेवतो. विद्यार्थ्यांना शाळेत टिकवून, शिकण्याची गोडी लावण्यासाठी शालेय नेता स्वतःच्या सर्जनशीलते चा विकास करून मुलांना कोणत्याही परीस्थित शिकते ठेवतो. तसेच पालक व समाजाच्या समस्या जाणीवपूर्वक समजून घेऊन त्यांना मार्गदर्शन करीत,मदत करीत समाजात शाळा व शिक्षकांप्रति विश्वास व जिव्हाळयाचे संबंध दृढ करतो. त्यांच्या व्यक्तिमत्वाला योग्य आकार देण्यासाठी नावीन्यपूर्ण, विविधांगी अध्ययन अनुभव मिळावेत यासाठी आग्रही असतो. त्यांना प्रगतीच्या दिशेने घेऊन जाण्यासाठी सतत धडपडत असतो आणि जिद्दीने सतत स्वतः कृतिशील राहून शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्याच्या प्रगतीचे आपले ध्येय साध्य करण्यात यशस्वी होतो.आपल्या राज्यात प्रतिकूल परिस्थिती यशस्वीपणे शिक्षणाचे कार्य करणारे अनेक मुख्याध्यापक आहेत ज्यांच्या कार्याचे यश त्यांच्या कार्याची साक्ष देतात. या यशोगाथांचा अभ्यास केल्यास कोणत्याही समस्येमुळे मुलांचे शिक्षण थांबूच शकत नाही हा विश्वास येण्यास आपल्याला वेळ लागणार नाही.

**संदर्भ सूची –**


1. शालेय नेतृत्व विकास कार्यक्रम पूरक वाचन साहित्य, जानेवारी २०१८ संचालक महाराष्ट्र विद्या प्राधिकरण पुणे
2. निष्ठा, मुख्याध्यापक आणि शिक्षक यांच्या समग्र प्रगतीसाठी राष्ट्रीय पुढाकार, डिसेंबर २०१९, संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे.
3. http://mr.vikaspedia.in/learning-resources
4. https://www.orfonline.org/marathi/bended-learning-is-future-of-education-68296/
5. https://maharashtratimes.com/editorial/ravivar-mata/corona-virus-and-education/articleshow/75097781.cms
6. (https://www.lokmat.com/urjaa/coronavirus-what-lock-down/
7. https://indiadarpanlive.com/?p=5412
8. http://indiadarpanlive.com/?p=9033
9. https://zeenews.india.com/marathi/india/what-is-lockdown-as-combating-covid-19-pm-narendra-modi-announces-it-addressing-nation/514001
10. https://en.wikipedia.org/wiki/Lockdown



| मोड्यूल विकसक | समन्वयन | मार्गदर्शक |
|---|---|---|
| डॉ.किरण धांडे | डॉ.ज्योती कुलकर्णी | डॉ.नेहा बेलसरे |
| वरिष्ठ अधिव्याख्याता, | समन्वयक | संचालक |
| राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,महाराष्ट्र,पुणे | महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा),औरंगाबाद | महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा),औरंगाबाद |